सांध्य दैनिक
# विदर्भ प्रजासत्ताक
https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on
E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026
❑ वर्ष - ४ थे ❑ अंक - १६६ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ गुरुवार दि. ६ ऑगस्ट २०२६ ❑ संपादक - डॉ. शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -४

# तुमच्या गद्दारीचा डाग मराठ्यांनी पुसला, माझ्याविरोधात डबल गेम खेळता का?

## जरांगेंचा शिंदेंवर आरोप



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.६जालना** एकनाथ शिंदे आमच्यासोबत डबल गेम खेळताय का? एकीकडे ओबीसीला सांभाळता, आमच्या अंगावर सोडता. आम्ही तुमचे आमदार, मंत्री निवडून आणतो. मी इतका शिंदेंवर कधीच तळतळलो नाही. मराठ्यांचे वाटोळे कराल तर तुमचा धुरळा उडवायला वेळ लागणार नाही. जे स्वत:ला स्वयंघोषित नेते समजतात ते तुमच्या ऑफिसला कसे येतात? तुमचे प्रवक्ते जे मराठा अभ्यासक आहे. मराठा समन्वयकही आहेत ते तुमच्या ऑफिसमध्ये मराठ्यांना विरोध करणाऱ्यांसोबत बाळासाहेब भवनला कसे येतात? मनोज जरांगेंविरोधात आंदोलन कर हे तुम्ही सांगितले का? असा सवाल करत मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी एकनाथ शिंदेंवर घणाघात केला. पत्रकार परिषदेत मनोज जरांगे पाटील म्हणाले की, तुम्ही काही मराठा समन्वयकांना माझ्याविरोधात आंदोलन करायला लावताय. एकनाथ शिंदे यांच्या सांगण्यावरून छत्रपती संभाजीनगर येथे एका कॉलेजमध्ये माझ्याविरोधात बैठका होत आहेत. एकीकडे मीही सोबत हवा आणि दुसरीकडे माझ्यावर अंगावर लोक घालता का? तुमच्या पक्षाचा नेता, कार्यकर्ता तिथे कॉलेजवर बैठका घेतात. ते सगळे तुमच्या पक्षातील लोक आहेत. मैत्री करायची तर ठासून करा, शत्रूत्व करायचे तर ठासून करावे. तुम्ही छक्के पंजे खेळाल अशी कधी अपेक्षा नव्हती. मराठ्यांच्या पोरांनी तुमच्या लोकांना निवडून आणण्यासाठी खस्ता खाल्ल्यात. आम्ही थोडेही लक्ष दिले नसते तर तुमचे लोक निवडून आले नसते. तुमचा गद्दारीचा डाग मराठ्यांनी पुसला. उद्धव ठाकरे बरा हे म्हणण्याची आमच्यावर वेळ येऊ देऊ नका अशी टीका त्यांनी केली.

तसेच एक रूपया तुमच्याकडून घेतला नाही. उदय सामंत, शंभुराज देसाई हे बरे वाटायला लागले. तुम्ही नेते आहात. आमचा माणूस म्हणून तुम्हाला तळहाताच्या फोडाप्रमाणे घेतले आणि तुम्ही ओबीसीचे लोक आमच्याविरोधात घालतात. माझ्याविरोधात आंदोलन करायला लावता. छत्रपती संभाजीनगरला तुमचा नेता माझ्याविरोधात बैठका घेतो. आता आंदोलने करणार. आमच्यामुळे जागा निवडून आल्या आणि तुमची प्रतिष्ठा वाढली. जागा पडल्या तर तुम्हाला कोण विचारेल? ही उपकाराची परतफेड करताय का? दीड वर्षापूर्वी शिरसाट यांच्या बंगल्यावर माझ्याविरोधात बैठका झाल्या. त्यावेळीही मला फोनवर यापुढे असं होणार नाही असं म्हटलं होते. तुमच्या न येणाऱ्या जागा आम्ही निवडून आणल्या. आता तुम्ही आमचा गेम करणार का असा प्रश्नही मनोज जरांगे पाटील यांनी एकनाथ शिंदेंना विचारला.

दरम्यान, मला आयुष्यात एकनाथ शिंदेंवर संशय नव्हता. इतके त्यांना मानतो. परंतु त्यांचे मंत्री ही प्रमाणपत्रे रद्द करताहेत. तुम्ही घात कराल हे आधीच उदय सामंत यांना सांगितले होते. संजय शिरसाट यांनाही फोन करून सांगितले होते. तुम्ही घात केला तर माझ्या समाजाचे वाटोळे होईल. तुमच्या राजकीय स्वार्थासाठी शिंदेंनी मराठ्यांचे वाटोळे केले. सत्तेत गेला म्हणून तुम्ही माज करणार का? आमच्या मराठ्यांच्या आरक्षणाला विरोध करणारे लोक तुमच्या ऑफिसला कसे येतात? तुमच्या प्रवक्त्यांसह बाळासाहेब भवनला नेहमी कसे काय असतात? तुमच्यावर संशय का येऊ नये? असा सवाल जरांगेंनी विचारला.

# मूळ प्रश्नाला बगल देत एखाद्या व्यक्तीला लक्ष्य करणे योग्य नाही

## आ.कडू यांचा जरांगे पाटलांना सल्ला संजय राऊतांचा ही घेतला समाचार



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.६अमरावती** :मराठा आरक्षण आंदोलनाचे नेते मनोज जरांगे यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर केलेल्या आरोपांवर प्रतिक्रिया देताना आ. बच्चू कडू यांनी संयम राखण्याचा सल्ला दिला. मूळ प्रश्नाला बगल देत एखाद्या व्यक्तीला लक्ष्य करणे योग्य नसून, त्यामुळे आंदोलनाच्या मुख्य मुद्द्यालाच न्याय मिळणार नाही, असे त्यांनी स्पष्ट केले.आ.बच्चू कडू म्हणाले की, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर आरोप करणे चुकीचे आहे. शिंदे मुख्यमंत्री असताना त्यांनी मनोज जरांगे यांना मदत केली होती. त्यामुळे कोणाविषयीही एकेरी भाषेत बोलणे किंवा वैयक्तिक टीका करणे योग्य नाही. अशा वक्तव्यांमधून नेमके काय साध्य होणार, याचाही विचार होणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले.शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) खासदार संजय राऊत यांच्या विधानांवरही बच्चू कडू यांनी टीका केली. संजय राऊत नेहमी भविष्यवाणी करत असतात; मात्र त्यांच्या बहुतांश भविष्यवाण्या खोट्या ठरल्या आहेत, असा दावा त्यांनी केला. त्यांना कोणत्या ज्योतिषाकडून किंवा न्यायाधीशाकडून माहिती मिळते हे मला माहिती नाही; पण ते जे बोलतात त्याच्या नेमके उलटच घडते, असा टोला त्यांनी लगावला. यावेळीही राऊत यांनी केलेले विधान चुकीचे ठरेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.शिवसेना पक्षाच्या निकाला बाबत बोलताना बच्चू कडू म्हणाले की, संपूर्ण प्रक्रिया कायद्याच्या चौकटीत पार पडलेली आहे. त्यामुळे जो काही निकाल लागेल, तो कायद्याला धरूनच असेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. शिवसेना हा पक्ष दीर्घकाळ टिकणारा असून भविष्यातही आपले अस्तित्व कायम ठेवेल, असेही त्यांनी सांगितले. त्यांच्या या वक्तव्यांमुळे राज्याच्या राजकीय वर्तुळात नव्या चर्चांना उधाण आले आहे.

# माझी नार्को टेस्ट करण्यास काहीच हरकत नाही

## मनोज जरांगेंच्या आरोपांवर बावनकुळेंचे प्रत्युत्तर



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.६मुंबई–** मराठा आरक्षणाचे नेते मनोज जरांगे पाटील यांनी नुकत्याच घेतलेल्या पत्रकार परिषदेत महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्यावर अतिशय गंभीर आरोप केले होते. बावनकुळेंच्या दबावामुळे आणि सांगण्या वरूनच मराठा समाजाची कुणबी जात प्रमाणपत्रे आणि त्यांची वैधता (तरश्रळव-ळीूं) रद्द केली जात आहे. त्यांची नार्को टेस्ट करा, अशी आक्रमक मागणी जरांगे यांनी केली होती. यावर आता चंद्रशेखर बावनकुळे यांनी पत्रकार परिषद घेऊन सविस्तर स्पष्टीकरण देत जरांगेंचे सर्व आरोप फेटाळून लावले आहेत.

मनोज जरांगे पाटील यांनी केलेल्या नार्को टेस्टच्या मागणीवर बोलताना बावनकुळे म्हणाले, माझी नार्को टेस्ट करता येईल, त्याला माझी कोणतीही हरकत नाही किंवा अडचण नाही. माझी त्याला पूर्ण परवानगी आहे. अशा शब्दांत त्यांनी जरांगेंचे आव्हान स्वीकारण्याची तयारी दर्शवली.

**आरोप-प्रत्यारोप करण्यात मला रस नाही** तुमच्या एका बावनकुळेंसाठी मी भाजपचे २५ ते ३० आमदार पाडून दाखवेन आणि देवेंद्र फडणवीसांचे वाटोळे करेन, या मनोज जरांगे यांच्या थेट इशाऱ्यावर बोलणे बावनकुळे यांनी टाळले. ते म्हणाले, आरोप करणे त्यांचे काम आहे, पण रोज आरोप-प्रत्यारोप करत बसणे, हा माझा पिंड नाही. ते काय बोलले, यावर मी जास्त चर्चा करणार नाही किंवा प्रत्युत्तरही देणार नाही. मला केवळ वस्तुस्थिती मांडायची होती, ती मी मांडली आहे.

# ठाकरे की शिंदे शिवसेना कोणाची?

## पुढील आठवड्यात होणार सुनावणी




**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.६ नवी दिल्ली** : फक्त महाराष्ट्राचेच नव्हे तर देशाचे लक्ष हे शिवसेना पक्ष आणि शिवसेनेच्या चिन्हाबाबत होणाऱ्या सर्वोच्च न्यायालयाच्या सुनावणीवर लागले आहे. अशामध्ये आज गुरुवारी (६ ऑगस्ट) सर्वोच्च न्यायालयात सुनावणी पार पडली. या सुनावणीमध्ये विधिमंडळ पक्ष खरा की राजकीय पक्ष खरा यावर कोर्टात युक्तीवाद झाला. विधिमंडळ पक्ष हा संपूर्ण राजकीय पक्ष होऊ शकत नाही. विधिमंडळातील नेमणूका या राजकीय पक्षाच्या नेत्याकडून केल्या जातात, असा शिवसेना उबठाचे वकील कपिल सिब्बल यांनी युक्तिवाद केला आहे. या प्रकरणाची पुढील सुनावणी ही पुढील आठवड्यात होणार आहे.

शिवसेना ठाकरे गटाचे बाजू मांडणारे ज्येष्ठ वकील कपिल सिब्बल सुनावणीच्या वेळी वारंवार २०१८ च्या घटनेचा संदर्भ देताना दिसत आहेत. कपिल सिब्बल यांनी आज सुद्धा निवडणूक आयोगाच्या कार्यपद्धतीवर थेट हल्लाबोल करताना म्हणाले की, दोन्ही गटांनी निवडणूक आयोगासमोर २०१८च्या घटनेनुसारच प्रतिज्ञापत्रे दाखल केली होती. मात्र असे असताना आयोगाने सोयीस्करपणे २०१८ची घटना नाकारून १९९९च्या घटनेचा आधार कसा घेतला? निवडणूक आयोगाकडे राजकीय पक्षाची घटना अवैध ठरवण्याचा कोणताही न्यायालयीन अधिकार नाही. त्यांच्याकडे जास्तीत जास्त पक्षाची मान्यता काढण्याचा अधिकार आहे, मात्र घटना नाकारून केवळ आमदारांच्या संख्येवर निर्णय देणे हे पूर्णपणे अन्यायकारक आहे, असे सिब्बल यांनी नमूद केले.

मूळ राजकीय पक्ष आणि विधिमंडळ पक्ष यातील फरक स्पष्ट करताना कपिल सिब्बल यांनी आरोप केला की, निवडणूक आयोगाने केवळ विधिमंडळातील (आमदारांच्या) बहुमतालाच मूळ पक्ष मानले. जर आयोगाने संघटनात्मक रचनेचा विचार केला असता, तर राष्ट्रीय कार्यकारिणी आणि लाखो प्राथमिक सदस्यांचा पाठिंबा उद्धव ठाकरे गटालाच होता. मात्र आयोगाने विधिमंडळ पक्षातील फूट म्हणजे मूळ पक्षातील फूट का? असा चुकीचा प्रश्न स्वत:लाच विचारला आणि त्यामुळे त्यांना चुकीचे उत्तर मिळाले, असा दावा सिब्बल यांनी केला.

न्यायमूर्ती बागची यांच्या या निरीक्षणावर कपिल सिब्बल यांनी निदर्शनास आणून दिले की, बंडखोर आमदारांनी केवळ पक्षप्रमुखांचा आदेशच धुडकावला नाही, तर स्वतःचा नवा प्रतोद आणि गटनेता नेमला होता. ही कृती म्हणजे त्यांनी स्वतःहून पक्षाचे सदस्यत्व सोडल्याचाच पुरावा आहे. हे सर्व प्रकार अपात्रतेची नोटीस बजावण्यापूर्वी आणि नंतरही घडले आहेत, असा आरोप केला. कपिल सिब्बल यांच्या या युक्तीवादानंतर न्यायमूर्ती बागची यांनी पुढच्या आठवड्यात सुनावणी ठेवली आहे. त्यामुळे आता सलग दोन दिवस झालेल्या सुनावणीनंतर पुढच्या आठवड्यात तरी शिवसेना पक्ष आणि चिन्हाचा निकाल लागतो का? याकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागले आहे.

# स्वस्त शिक्षण अन् बेरोजगारीवर CJP चा एल्गार

## 'क्या बोलती पब्लिक' मोहिमेद्वारे युवकांचे प्रश्न मांडणार– अभिजित दिपके



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.६छत्रपती संभाजीनगर** उगझच्या कोअर कमिटीची बैठक संपल्यानंतर संस्थापक अभिजित दीपके यांनी माध्यमांशी संवाद साधत पक्षाच्या पुढील वाटचालीची रूपरेषा जाहीर केली. यावेळी त्यांनी 'क्या बोलती पब्लिक' ही राष्ट्रव्यापी मोहीम सुरू करण्याची घोषणा केली. या मोहिमेद्वारे देशभरातील नागरिकांशी थेट संवाद साधून त्यांच्या समस्या, अपेक्षा आणि सूचना जाणून घेतल्या जाणार असल्याचे त्यांनी सांगितले. युवकांचे शिक्षण, वाढती बेरोजगारी आणि महागड्या शिक्षणामुळे पालकांवर पडणारा आर्थिक भार हे उगझच्या आंदोलनाचे प्रमुख मुद्दे असतील, असे त्यांनी स्पष्ट केले.

देशातील शिक्षण व्यवस्था सर्वसामान्यांना परवडणारी आणि गुणवत्तापूर्ण व्हावी, यासाठी व्यापक जनआंदोलन उभारण्याचा निर्धार दीपके यांनी व्यक्त केला. लहान मुलांच्या शिक्षणासाठी लाखो रुपयांची फी भरावी लागत असल्याने अनेक कुटुंबे आर्थिक अडचणीत सापडत असल्याचे त्यांनी नमूद केले. देशातील भीतीचे वातावरण कमी होत असून नागरिक आता रस्त्यावर उतरून प्रश्न विचारू लागले आहेत.

# कुणबी प्रमाणपत्रे जाणीवपूर्वक रद्द होत नाहीत!

## जरांगेंना मुख्यमंत्री फडणवीसांचे प्रत्युत्तर, म्हणाले– भाजपच्या नेत्यांचीही झाली, रिजेक्शन रेट १० ते २५ टक्के असतोच





**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.६मुंबई**

मराठा आरक्षण नेते मनोज जरांगे पाटील यांनी कुणबी प्रमाणपत्र रद्द केल्याच्या प्रकरणावरून सरकारवर आणि विशेषतः मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर गंभीर आरोप केले होते. राजकीय द्वेषापोटी आणि काही मंत्र्यांच्या सांगण्यावरून हजारो विद्यार्थ्यांची कुणबी प्रमाणपत्रे रद्द केली जात आहेत, असा जरांगेंचा आरोप होता. यावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज मुंबईत माध्यमांशी बोलताना सविस्तर स्पष्टीकरण दिले आहे.

पत्रकारांनी विचारलेल्या प्रश्नावर उत्तर देताना फडणवीस म्हणाले, मनोज जरांगे पाटील नेमके काय बोलले हे मी पूर्ण ऐकलेले नाही.

मराठा आरक्षण नेते मनोज जरांगे पाटील यांनी कुणबी प्रमाणपत्र रद्द केल्याच्या प्रकरणावरून सरकारवर आणि विशेषतः मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर गंभीर आरोप केले होते. मात्र, मी अगदी स्पष्टपणे सांगतो की, जेव्हा कोणतीही प्रमाणपत्रे जात पडताळणी समितीकडे जातात, तेव्हा ही समिती सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार आणि नियमांच्या अंतर्गत काम करते. यामध्ये राज्य सरकारचा किंवा कुठल्याही मंत्र्याचा कोणताही हस्तक्षेप किंवा दखलंदाजी नसते.

### ■ १० ते २५ टक्के रिजेक्शन रेट असतोच

कुणबी प्रमाणपत्रे रद्द होण्यामागील कारणांचे विश्लेषण करताना फडणवीस म्हणाले, जात पडताळणी समितीकडे मोठ्या प्रमाणात वेगवेगळी प्रमाणपत्रे येतात. त्यामध्ये ओबीसी किंवा नॉन-कुणबी प्रमाणपत्रांचा विचार केला, तर साधारण १० टक्के आणि काही ठिकाणी कागदपत्रांची पूर्तता न झाल्यास २५ टक्क्यांपर्यंत रिजेक्शन रेट असतो. त्यामुळे कोणीतरी जाणीवपूर्वक किंवा राजकीय द्वेषातून ही प्रमाणपत्रे रद्द करत आहे, असा आरोप करणे चुकीचे आहे.

### ■ भाजपच्या नेत्यांचीही प्रमाणपत्रे रद्द झाली आहेत

कुठलाही राजकीय हस्तक्षेप या प्रक्रियेत नसतो, हे सांगताना फडणवीस यांनी एक उदाहरण दिले. ते म्हणाले, आम्ही सत्तेत आहोत, तरीही भाजपच्या अनेक नगरसेवकांची आणि जिल्हा परिषद सदस्यांची प्रमाणपत्रे जात पडताळणी समितीने रद्द केली आहेत. ही एक क्वासी-ज्युडिशियल प्रक्रिया आहे, जी सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशाप्रमाणेच चालते.

### राज्य सरकारचा ग्राम पंचायतींबाबत मोठा निर्णय

# पाच नव्या योजनांना मंजुरी




**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.६मुंबई–** राज्य शासनाने ग्रामपंचायतींसाठी पाच नव्या योजनांना मंजुरी दिली आहे. जिल्हा वार्षिक योजनांतर्गत या योजनांसाठी विशेष निधी उपलब्ध करून देण्यात येणार आहे. ग्रामपंचायतींना विकासकामांसाठी ९० लाख रुपयांपर्यंत निधी मिळणार आहेत. सध्या जिल्हा वार्षिक योजनेत 'ग्रामपंचायतीला जनसुविधांसाठी विशेष अनुदान' या घटकातून निधी दिला जातो. या योजनेचे निकष २०१० मध्ये निश्चित करण्यात आले होते.

गेल्या काही वर्षांत ग्रामपंचायतींच्या विकासकामांची व्याप्ती वाढल्याने नव्या गरजांसाठी स्वतंत्र निधीची मागणी होत होती. त्यानुसार शासनाने पाच नव्या योजनांना मंजुरी शासनाने दिली आहे. ग्रामविकास विभागाचे उपसचिव प्रशांत पाटील यांनी काढलेल्या आदेशानुसार, या पाच योजनांतील मंजूर कामांसाठी इतर कोणत्याही शासकीय योजनेतून पुन्हा निधी घेता येणार नाही. एकाच कामासाठी दुहेरी निधीचा वापर होऊ नये, यासाठी ही अट घालण्यात आलीय.

यात योजनांमध्ये गावाच्या हद्दीतील शासकीय पडीक जागांचे सुशोभीकरण करण्यासाठी १५ लाख रुपये, शासकीय इमारतींवर सौर ऊर्जा प्रणाली बसविण्यासाठी २० लाख रुपये, वाचनालय इमारतीसाठी २० लाख रुपये, क्रीडांगण विकासासाठी २० लाख रुपये आणि सार्वजनिक दिवाबत्ती व्यवस्थेसाठी १५ लाख रुपयांचा निधी दिला जाईल.

ग्रामपंचायत, जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणुकीत राखीव जागांवर निवडून आलेल्या सदस्यांना १२ महिन्यांच्या आत जातवैधता प्रमाणपत्र सादर करावं लागणार आहे. तसं न केल्यास निवड रद्द होणार आहे. निर्धारित मुदतीत जात वैधता प्रमाणपत्र सादर केलं नाही तर संबंधित व्यक्तीची निवड भूतलक्षी प्रभावाने रद्द झाल्याचे मानण्यात येईल.

## संपादकीय ......

# खैरनार, अण्णा, अभिजीत दीपके

*देशात आजवर सत्ताधार्यांविरोधात जी आंदोलने झाली, त्याचे मूळ कारण होते भ्रष्टाचार. सत्तेत असलेल्यांकडून जेव्हा भ्रष्ट आचार सुरू होतो त्यावेळी सगळ्या यंत्रणा विस्कळीत होतात, त्याचा फटका सामान्य माणसांना बसू लागतो. लोकांच्या मनात सत्तेविरोधात खदखद निर्माण होते, अस्वस्थता असते. त्याला कुणाचे नेतृत्व मिळाले की, त्या मुखातून समाजात खदखदणारा ज्वालामुखी बाहेर पडतो. त्यानंतर त्याला आवरणे सत्ताधार्यांना अवघड होऊन बसते. त्यावेळी त्या आंदोलकांच्या मागे किंवा सोबत असतात, ते विरोधी पक्षातील नेते. या आंदोलनात उतरून त्याला वेगाने सर्वदूर पसरवण्याची ताकद तरुणांकडे असते. त्यामुळे अशा आंदोलनांमध्ये प्रामुख्याने तरुण उतरलेले दिसतात. कारण त्यांच्यामध्ये प्रचंड उत्साह असतो, त्यांची ऊर्जा अजून उपयोगात यायची असते, रक्त सळसळत असते, कुछ तुफानी हो जाए, अशी मानसिकता असते, अशा वेळी यांना नेतृत्व मिळाले तर ते उफाळून उठतात, ते वय परिणामांचा विचार करणारं नसतं. काही तरी करून दाखवण्याची उमेद असते.*

*स्वतंत्र भारतात तरुणाईने पेटून उठून पहिले आंदोलन केले होते ते जयप्रकाश नारायण यांच्या नेतृत्वाखाली संपूर्ण क्रांती आंदोलन. त्याला आता ५० वर्षे झाली. त्यावेळी तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांची सत्ता होती, शासकीय पातळीवर आणि यंत्रणांमध्ये भ्रष्टाचार बोकाळला होता. त्याचे चटके विद्यार्थ्यांसह सामान्य माणसांना बसले. तेव्हा बिहारमधून विद्यार्थ्यांच्या आंदोलनाला सुरुवात झाली. त्यावेळी नवतरुणांनी सत्ताधार्यांना जाब विचारला. या आंदोलनाला आज सत्तेत आहेत, त्या भाजपचे पूर्वरुप असलेल्या जनसंघानेही पाठिंबा दिलेला होता. बाकीचेही अनेक पक्ष त्यात होते. त्यांची मिळून जनता पार्टी झाली. पुढे ही शक्ती इतकी वाढली की, त्या तडाख्यात इंदिरा गांधी यांचा पराभव झाला. पुढे निवडणुका झाल्या, त्यात जनता पार्टीची सत्ता आली. पण या आंदोलनाचे नेतृत्व करणारे जयप्रकाश नारायण या नव्या सरकारमध्ये कुठेही नव्हते.*

*१९९४-९५ च्या काळात महाराष्ट्रात मुंबई महापालिकेतील उपायुक्त गो. रा. खैरनार यांनी महाराष्ट्राचे तत्कालीन मुख्यमंत्री शरद पवार यांच्यावर भूखंड घोटाळ्याचे भरमसाठ आरोप केले होते, आपल्याकडे शरद पवारांविरोधात ट्रकभर पुरावे आहेत, असा दावा त्यांनी केला. मुंबईतील अनधिकृत बांधकामांचे कर्दनकाळ म्हणून खैरनार प्रसिद्ध होते, त्यांनी अगदी अंडरवर्ल्ड डॉन ज्याच्या नावाने लोकांचा थरकाप उडत असे, त्या दाऊद इब्राहिमला आव्हान देऊन त्याची अनधिकृत बांधकामे जमीनदोस्त केली होती, त्यामुळे त्यांच्याविषयी लोकांच्या मनात प्रचंड विश्वासार्हता निर्माण झालेली होती, ते शरद पवारविरोधी आंदोलनाचे हिरो झाले होते. त्या आंदोलनाचा फटका पवारांना बसला आणि त्यांची सत्ता गेली. त्यानंतर राज्यात शिवसेना-भाजप युतीची सत्ता आली, पण गो.रा.खैरनार बाजूला पडले होते. त्यांच्या आक्रमकपणाला चाप बसवण्याचा प्रयत्न झाला.शासकीय पातळीवरील भ्रष्टाचाराला आळा बसावा, म्हणून लोकपाल कायदा आणण्यासाठी अरविंद केजरीवाल यांनी समाजसेवक अण्णा हजारे यांच्या पाठिंब्याने २०११-१२ या काळात दिल्लीत आंदोलन पुकारले होते. आम आदमी हा त्याचा केंद्रबिंदू ठेवून त्याच नावाचा पुढे पक्ष काढण्यात आला. त्या माध्यमातून दिल्लीतील विधानसभा निवडणूक लढवण्यात आली. त्या अगोदर अण्णा हजारे यांनी महाराष्ट्रात भ्रष्ट मंत्र्यांविरोधात उपोषण आंदोलन करून त्यांना राजीनामा द्यायला भाग पाडले होते. त्यामुळे राज्य आणि राष्ट्रीय पातळीवर भ्रष्टाचारविरोधी नायक म्हणून त्यांची प्रतिमा तयार झालेली होती. त्यांनी राळेगणसिद्धी हे आदर्शगाव उभे केले. ते माजी सैनिक आहेत. ते गांधीवादी आहेत. त्यामुळे त्यांच्याकडे प्रतिगांधी म्हणून पाहिले जात होते. पण त्यावेळी काँग्रेसच्या अध्यक्षा आणि खासदार सोनिया गांधी यांनी महात्मा गांधी एकच होऊन गेले, दुसरे गांधी होऊ शकत नाहीत, असे लोकसभेत ठणकावून सांगितले. पण अण्णांच्या पाठिंब्याने केजरीवाल यांनी सुरू केलेल्या आंदोलनाचा प्रभाव वाढत गेला. केजरीवाल यांनी राजकारणात उतरू नये, असे अण्णांचे सुरुवातीला म्हणणे होते, वाढणारा पाठिंबा पाहिल्यावर केजरीवाल यांना राजकीय मोह अनावर झाला. त्यांनी आम आदमी पार्टीची स्थापना केली. त्याला यश येऊन केजरीवाल दिल्लीचे मुख्यमंत्री झाले, पण ज्यांच्यामुळे केजरीवाल यांना ते राजकीय पद मिळाले, त्या अण्णा हजारे यांच्याशी त्यांचे फारसे पटेनासे झाले. अण्णा बाजूला पडले.केंद्रात युपीए -२ मध्ये मनमोहन सिंग यांच्या नेतृत्वाखालील सरकारमध्ये काही मंत्री घोटाळ्यात अडकले होते. त्यात सिंग यांचे वयही झालेले होते. त्यामुळे आघाडीच्या सरकारमध्ये घटक पक्ष आपापले हित साधण्यात मश्गुल होते. पाकिस्तानस्थित अतिरेकी संघटनांनी उचल खाल्ली होती, अशावेळी गुजरातचे विकास पुरुष असलेले नरेंद्र मोदी केंद्रात आले तर मोठा बदल घडेल अशी आशा नव्या पिढीला वाटत होती. मोदी सत्तेत येण्यास त्यावेळची तरुणाई आणि सोशल मीडिया यांचा मोठा हातभार होता. आजच्या जेनझीने मोदींना झुकवले, त्यांचा अट्टाहास मोडीत काढला. अशाच जेनझीने त्यांना सत्तेत आणले होते. यावेळी सरन्यायाधीश सूर्यकांत यांनी नवतरुणांना झुरळ म्हणून संबोधले आणि खदखदत असलेला लाव्हा बाहेर उफाळून आला. त्याला अभिजीत दीपके या तरुणाचे नेतृत्व लाभले.सध्या अभिजीतच्या मागे बरेच विरोधी पक्ष पुढे राहिले आहेत. त्यांना माहीत झाले आहे, अभिजीत हा उगवता सूर्य आहे, त्यामुळे ते त्याला दंडवत घालत आहेत. कारण, पुढील काळात त्यांचा केंद्रीय सत्तेपर्यंत पोहोचण्याचा मार्ग तोच सुकर करणार आहे. आजवरचा इतिहास पाहिला तर राजकीय नेते नवी ऊर्जा असलेल्या व्यक्तीचा वापर करून सत्तेचे सिंहासन गाठतात, पण ज्यांची शिडी करून ते गाठले जाते, ती शिडी ते ढकलून देतात. अभिजीत दीपके याने प्रधानांचा राजीनामा घेण्यात आल्यानंतर अब सुबह हो गई है मामू, असा टोला पंतप्रधानांना मारला. पण आज जे विरोधी पक्ष त्याला डोक्यावर घेत आहेत, त्यांच्यासाठी तो एक शिडी आहे, हेही त्याला विसरून चालणार नाही.*

# अमरावतीत महाराष्ट्र राज्य सब-ज्युनियर बॅडमिंटन निवड स्पर्धेचे दिमाखदार उद्घाटन

## पाच दिवस चालणाऱ्या स्पर्धेचा ९एप्रिल ला समारोप

विदर्भ प्रजासत्ताक
**दि.६ अमरावती**

अमरावती सिटी अँड डिस्ट्रिक्ट बॅडमिंटन असोसिएशनच्या वतीने आयोजित 'योनेक्स सनराईज जी.एच. रायसोनी मेमोरियल द्वितीय महाराष्ट्र राज्य सब-ज्युनियर (अंडर-९, अंडर-११ व अंडर-१३) निवड बॅडमिंटन स्पर्धा २०२६' चे उद्घाटन आज बुधवारी, ५ ऑगस्ट २०२६ रोजी सायंकाळी ७ वाजता जिल्हा क्रीडा संकुल, मोर्शी रोड, अमरावती येथे उत्साहात पार पडले.उद्घाटन समारंभाला अमरावती मतदारसंघाच्या आमदार सौ. सुलभाताई खोडके, अमरावती विभागाच्या विभागीय आयुक्त नयना गुंडे (भा.प्र.से.), क्रीडा व युवक सेवा विभागाचे उपसंचालक अविनाश पुंड, महाराष्ट्र बॅडमिंटन असोसिएशनचे सचिव सिद्धार्थ पाटील तसेच रायसोनी एज्युकेशनचे जनसंपर्क संचालक अमित गंधारे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.यावेळी विभागीय आयुक्त नयना गुंडे यांनी स्पर्धा सुरु झाल्याचे जाहीर केले.या राज्यस्तरीय निवड स्पर्धेत राज्यभरातील उदयोन्मुख बाल बॅडमिंटनपटू सहभागी झाले असून, अंडर-९, अंडर-११ आणि अंडर-१३ गटांतील खेळाडूंना आपल्या कौशल्याचे प्रदर्शन करण्याची संधी मिळणार आहे. या स्पर्धेतून उत्कृष्ट खेळाडूंची राज्य संघासाठी निवड केली जाणार असल्याने स्पर्धेला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे.या स्पर्धेमध्ये राज्यभरातील एकूण ७०३ खेळाडू सहभागी झाले आहेत.या स्पर्धेनंतर ठाणे येथे पुन्हा चॅम्पियन्सशिप स्पर्धा होईल व त्यानंतर विजेत्या खेळाडूंचं महाराष्ट्र च्या टीम मध्ये निवड करण्यात येणार असल्याचे सुनील गद्रे अमरावती सिटी अँड डिस्ट्रिक्ट बॅडमिंटन असोसिएशनचे उपाध्यक्ष यांनी दिली. उद्घाटनानंतर प्रथम सामना कोर्ट १ वर अकोला विरुद्ध नांदेड तर कोर्ट २वर पुणे विरुद्ध मुंबई यांच्या मध्ये खेळवला गेला. पाच दिवस चालणाऱ्या या स्पर्धेचा ९एप्रिल ला समारोप होणार आहे. उपस्थित मान्यवरांनी युवा खेळाडूंना शुभेच्छा देत उत्कृष्ट खेळ, क्रीडाभावना आणि शिस्तीचे पालन करण्याचे आवाहन केले. आयोजकांनी मान्यवरांसह पालक, प्रशिक्षक, क्रीडाप्रेमी आणि नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून स्पर्धेला प्रोत्साहन द्यावे, असे आवाहन आयोजकांनी यावेळी केले.



**आ.सुलभाताई खोडके व विभागीय आयुक्त नयना गुंडे यांच्यात रंगला सामना**

बॅडमिंटन स्पर्धा २०२६' चे उद्घाटन झाल्यानंतर कोर्ट १ वर आ.सुलभाताई खोडके व विभागीय आयुक्त नयना गुंडे या कोर्ट वर उतरत बॅडमिंटनचा आनंद घेतला या वेळी दोघेंनेही जोरदार शॉट लावत उपस्थितांची मने जिंकलीत.

# उच्च शिक्षण, संशोधन क्षेत्रात अमरावती विद्यापीठाचे यश

## क्युएस आशिया युनिव्हर्सिटी रँकिंगमध्ये स्थान

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.६अमरावती**

जागतिक स्तरावरील अत्यंत प्रतिष्ठित 'क्युएस आशिया युनिव्हर्सिटी रँकिंग २०२६' मध्ये संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाने उल्लेखनीय कामगिरी करत दमदार झेप घेतली आहे. विद्यापीठाने आशिया खंडात १००१-११०० च्या बँडमध्ये, तर दक्षिण आशियात ३३० वा क्रमांक पटकावून विदर्भासह संपूर्ण महाराष्ट्राच्या शैक्षणिक शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे. 'क्युएस वल्र्ड युनिव्हर्सिटी रँकिंग २०२६ इयरबुक'मध्ये विद्यापीठाच्या या यशाची अधिकृत नोंद घेण्यात आली आहे.

कुलगुरू डॉ. बारहाते यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यापीठाच्या अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाने शैक्षणिक गुणवत्ता, संशोधन





संस्कृती, नवोपक्रम, विद्यार्थी विकास आणि आंतरराष्ट्रीय निकषांची अतिशय प्रभावीपणे अंमलबजावणी केली. या कक्षाचे संचालक डॉ. संदीप वाघुळे यांनी विविध उपक्रमांचा पाठपुरावा केला. गेल्या दोन वर्षात अंतर्गत गुणवत्ता कक्षामार्फत विद्यापीठात महत्त्वाचे सकारात्मक बदल घडवून आणण्यात आलेत. प्रत्येक शिक्षकासाठी दरवर्षी किमान तीन दर्जेदार संशोधन निबंध प्रकाशित करण्याचे धोरण आखण्यात आले. स्कोपस, डब्ल्यूओएस आणि यूजीसीच्या निकषांनुसार संशोधनाचे अंतर्गत परीक्षण सुरू करण्यात आले. सर्व विभागांमध्ये मूल्यवर्धित कोर्सेसची संख्या मोठ्या प्रमाणावर वाढवण्यात आली. एपीआय प्रमाणपत्र प्रणाली आणि सीएएस (करिअर डव्हान्समेंट स्कीम) प्रक्रियेला गती तसेच परीक्षेचे निकाल जाहीर करण्याचा कालावधी लक्षणीयरीत्या कमी करण्यात आला. त्याचबरोबर 'स्कुल कनेक्ट' कार्यक्रम, संलग्न महाविद्यालयांच्या अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे मार्गदर्शन, माजी विद्यार्थ्यांचा सहभाग आणि उद्योग जगतासोबतच्या सामंजस्य करारांमध्ये वाढ करण्यात आली. संशोधन आणि विद्यार्थी विकासात सकारात्मक बदल या उपक्रमांमुळे विद्यापीठातील उच्च दर्जाच्या आंतरराष्ट्रीय नियतकालिकांमधील संशोधन प्रकाशनात मोठी वाढ झाली आहे. याशिवाय पेटंट्सची संख्या, संशोधन फेलोची संख्या, विद्यार्थ्यांचे प्लेसमेंट, उच्च शिक्षणातील प्रवेश, आणि क्रीडा व सांस्कृतिक क्षेत्रातील कामगिरीत कमालीची सुधारणा दिसून येत आहे.

हे यश विद्यापीठातील सर्व शिक्षक, अधिकारी, कर्मचारी, संशोधक, विद्यार्थी आणि अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाच्या सामूहिक प्रयत्नांचे फळ आहे. गुणवत्ता, संशोधन, नवोपक्रम आणि उद्योग सहकार्यावर अधिक भर देत अमरावती विद्यापीठाला जागतिक स्तरावर नवीन उंचीवर नेण्याचा आमचा संकल्प आहे.

**- डॉ. मिलिंद बारहाते कुलगुरू, अमरावती विद्यापीठ.**

# लग्नातील अनावश्यक खर्चाला फाटा


## विद्यार्थिनीच्या शिक्षणाची जबाबदारी उचलत भंडारी कुटुंबीयांचा आदर्श



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.६धा .रेल्वे-** विवाह सोहळ्यांमधील वाढता दिखाऊपणा आणि अनावश्यक खर्चाला छेद देत धामणगावरेल्वे येथील भंडारी कुटुंबीयांनी समाजापुढे प्रेरणादायी आदर्श ठेवला आहे. मुलगा यश भंडारी यांच्या विवाहानिमित्त होणाऱ्या अनावश्यक खर्चाला फाटा देत एका गरजू व होतकरू विद्यार्थिनीच्या संपूर्ण वर्षभराच्या शैक्षणिक खर्चाची जबाबदारी स्वीकारून त्यांनी सामाजिक बांधीलकी जपली. सध्या विवाहसोहळ्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर सजावट, मनोरंजन आणि विविध कार्यक्रमांवर लाखो रुपयांचा खर्च केला जातो. अशा परिस्थितीत गांधी चौक परिसरातील प्रसन्न भंडारी व पूजा भंडारी यांनी आपल्या मुलाच्या विवाहाला सामाजिक सेवेची जोड देण्याचा निर्णय घेतला. त्यांनी विवाहसोहळ्याच्या मंचावर श्रीराम शिक्षण संस्थेतील गरजू व होतकरू विद्यार्थिनी संस्कृती हिला शैक्षणिक वर्ष २०२६-२७ साठी लागणाऱ्या संपूर्ण शैक्षणिक साहित्याचा व वर्षभराच्या शैक्षणिक खर्चाचा लाभ प्रदान केला. या उपक्रमामुळे विद्यार्थिनीच्या शिक्षणाचा आर्थिक भार हलका झाला असून तिच्या शैक्षणिक वाटचालीला मोठा आधार मिळाला आहे.

# गळक्या छताखाली युनीयन बँकेचा कारभार

## महत्त्वाची कागदपत्रे धोक्यात, कार्यालयातील उघड्या वायरिंगमुळे शॉर्टसर्किटची भीती



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.६चिखलदरा**

चिखलदरा येथील नगरपरिषद इमारतीत भाडेतत्त्वावर सुरू असलेल्या युनीयन बँक ऑफ इंडियाच्या शाखेची दुरवस्था समोर आली आहे. इमारतीत ठिकठिकाणी छत गळत असल्याने बँकेतील महत्त्वाची कागदपत्रे व फायिली खराब होण्याचा धोका निर्माण झाला आहे. याबाबत नगरपरिषद आणि बँक व्यवस्थापनाकडून आवश्यक दुरुस्ती होत नसल्याची तक्रार व्यक्त केली जात आहे.

मुख्य बाजार चौकातील या शाखेत दररोज शेकडो ग्राहकांची वर्दळ असते. मात्र, बँकेतील विद्युत वायरिंग जीर्ण होऊन अनेक ठिकाणी उघडी पडली आहे. त्यामुळे पावसाळ्यात शॉर्टसर्किट होऊन अपघात होण्याची भीती कर्मचारी व ग्राहकांनी व्यक्त केली आहे. महिला कर्मचाऱ्यांसाठी स्वतंत्र स्वच्छतागृह नसल्याने गैरसोय होत असून, पिण्याच्या पाण्याचीही योग्य सुविधा उपलब्ध नसल्याचे सांगितले जात आहे. बँकेतील फायिलींमध्ये उंदरांचा वावर असून, भिंतींना तडे गेले आहेत. काहीवेळा बँकेच्या आत सापही आढळल्याचे कर्मचाऱ्यांचे म्हणणे आहे. त्यामुळे कागदपत्रांच्या सुरक्षिततेबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. बँक व्यवस्थापन आणि नगरपरिषद प्रशासनाने तातडीने इमारतीची दुरुस्ती करून सुरक्षित सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, अशी मागणी नागरिकांनी केली आहे.

# तीन शिक्षकांवर मुख्याधिकाऱ्यांद्वारे कारवाई

## अंजनगाव सुर्जी नगरपरिषदेचा दणका

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.६अमरावती-** येथील नगरपरिषद अंतर्गत येणाऱ्या शाळांमधील अनियमितता आणि वरिष्ठांच्या आदेशाचे उल्लंघन करणाऱ्या तीन शिक्षकांवर मुख्याधिकारी विजय लोहकरे यांनी कारवाई केली आहे. यामध्ये दोन सहायक शिक्षकांची वार्षिक वेतनवाढ रोखण्यात आली असून, एका मुख्याध्यापकाला वैद्यकीय मंडळामार्फत तपासणीसाठी यवतमाळ येथे पाठविण्यात आले आहे. नगरपरिषदेच्या शिक्षण विभागात या कारवाईमुळे एकच खळबळ उडाली आहे. नगरपरिषद कार्यालयाने ४ ऑगस्टला हे तीन स्वतंत्र आदेश निर्गमित केले आहेत. नगरपरिषदेच्या शाळांची माहिती, वरिष्ठ कार्यालयाच्या सूचना, शालेय उपक्रम, विद्यार्थी गुणवत्ता याबाबत शासनाचे उपक्रम व सूचना आपल्या नगरपरिषद शाळेतील मुख्याध्यापक, शिक्षकांपर्यंत पोहोचवणे व संबंधित इतर कामे करण्यासाठी मुख्याधिकाऱ्यांनी दोन शिक्षकांकडे केंद्र समन्वयक पदाचा अतिरिक्त कार्यभार सोपवला होता. अनिल धारणे, अमोल तिडके अशी त्यांची नावे आहेत.

मात्र, दोन्ही शिक्षकांनी सदर आदेश न स्वीकारता परत केला व अतिरिक्त कार्यभार काढण्याबाबत पत्र दिले. मुख्याधिकारी विजय लोहकरे यांनी याला नियुक्ती आदेशाची अवहेलना मानले आहे. हे कृत्य महाराष्ट्र नागरी सेवा नियम (शिस्त अपिल व वर्तणूक) नियम





१९७९ मधील तरतुदीनुसार शिस्तभंगाच्या कारवाईस पात्र आहे, असे नमूद करून दोन्ही शिक्षकांची माहे जुलै-२०२६ ची वार्षिक वेतनवाढ रोखण्यात आली आहे.

मुख्याध्यापक मो. शफीक गुलाम कादिर यांच्या संदर्भात मुख्याधिकाऱ्यांनी यवतमाळ येथील वैद्यकीय महाविद्यालाच्या अधिकाऱ्यांना पत्र दिले आहे. पत्रात म्हटले आहे की, कादिर यांना आपणाकडे वैद्यकीय तपासणीकरिता पाठविण्यात येत आहे. त्यांची वैद्यकीय मंडळामार्फत तपासणी करून तपासणी अहवाल देण्यात यावा. कादिर यांना हे पत्र मिळाल्यापासून सात दिवसांच्या आत यवतमाळ वैद्यकीय महाविद्यालयात उपस्थित राहून आपली वैद्यकीय तपासणी करून अहवाल सादर करण्याचे सूचित करण्यात आले आहे. नगरपरिषद शाळांमधील शैक्षणिक गुणवत्ता वाढवण्यासाठी आणि प्रशासनात शिस्त आणण्यासाठी मुख्याधिकारी लोहकरे यांनी ही कारवाई केली आहे. या कारवाईमुळे शिक्षकांचे धाबे दणाणले आहे. पथदिवे देखभाल दुरुस्ती करणाऱ्या कंपनीचे सुपरवायझर शुभम बोरोडे यांच्यावर कारवाईचे आदेश दिले आहे.

# सापनच्या जलशुद्धीकरण केंद्रातून चामडोक पळाले

## पाणी उपसा व जाळीचा प्रयोग ठरला यशस्वी, अधिकाऱ्यांच्या कृतीला यश

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.६परतवाडा,-** सापन धरणावरून जलशुद्धीकरण केंद्राच्या माध्यमातून ८३ गावांना पाणीपुरवठा सुरू असताना अचानकपणे मागील तीन दिवसांपासून त्यामध्ये कोटींच्या संख्येने चामडोकांची संख्या आढळून आली होती. अशावेळी उपसा करण्याचा व वेगळ्या प्रकारची जाळी बसविण्याचा केलेला प्रयोग यशस्वी ठरला असून आता स्वच्छ पाणीपुरवठा सुरू होण्यास मार्ग मोकळा झाल्याने अधिकाऱ्यांच्या कृतीला यश आले आहे.महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या जलजीवन मिशन अंतर्गत अचलपूर तालुक्यातील ४९ व चांदूरबाजार तालुक्यातील ३४ गावांना सापन धरणावरून पाणी पुरवठा केला जातो. मागील तीन दिवसांपासून पाण्याचे नमुने तपासताना सदर पाण्यात मोठ्या प्रमाणात चामडोकांची संख्या आढळून आली होती. या सूक्ष्मजीवांची संख्या कोटींच्या घरात गेल्याचे निदर्शनास आल्याने प्रशासनाने तातडीने उपाययोजना हाती घेतली होती. सुरवातीला पीएसी, ब्लिचिंग पावडर, पोटॅशियम परमॅग्नेट, मीठ आणि रसायन यांचा वापर करून चामडोक नियंत्रणाचा प्रयत्न करण्यात आला होता. मात्र हे सूक्ष्मजीव नष्ट न होता वाळूच्या गाळणीतूनही जलशुद्धीकरण केंद्रात प्रवेश करीत असल्याचे आढळून आले होते. मग अधिकाऱ्यांनी विशेष प्रकारची जाळी बसवून घेतली, यासह धरणातील पाण्याचा उपसा सुरू करण्यात आला. सोबतच त्याठिकाणी असलेल्या जलशुद्धीकरण केंद्र व संपूर्ण परिसराची स्वच्छता करण्यात आली. यादरम्यान पाणीपुरवठा प्रभावी होत असल्यामुळे यादरम्यान महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने जुने पर्याय वापरून पाणीपुरवठा सुरू ठेवला होता. स्वतः तीन दिवस महाराष्ट्र जीवन प्राधिकरणचे अधिकारी संपूर्ण परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी प्लांटवर तळ ठोकून होते. आज पाण्याचे नमुने घेतल्यानंतर ते पूर्ण रूपात स्वच्छ आढळून आले.



# जड वाहनबंदीत अत्यावश्यक सेवांना प्रशासनाचा दिलासा

## रेशन, इंधन व परीक्षा वाहनांना प्रवेश

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.६अमरावती–** शहरात सकाळी ६ ते रात्री १० या वेळेत लागू असलेल्या जड वाहन प्रवेशबंदीतून अत्यावश्यक सेवाच्या काही वाहनाना जिल्हा प्रशासनाने सूट दिली आहे. राजापेठ उड्डाणपुलावरील भीषण अपघातानंतर रस्ते सुरक्षा अबाधित ठेवणे आणि प्राणघातक अपघातांना आळा घालण्यासाठी ही बंदी लागू करण्यात आली होती. मात्र, धान्य, इंधन आणिपरीक्षेसंबंधी साहित्याचा, पुरवठा बाधित होऊ नये, यासाठी प्रशासनाने सुधारित आदेश काढला आहे.



बीपीसीएल आणि आयओसीएल जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी जारी केलेल्या आदेशानुसार लक्ष्यानिर्धारित सार्वजनिक वितरण प्रणाली असा स्पष्ट फलक असलेली हिरव्या रंगाची रेशन धान्य वाहतूक करणारी वाहने, एचपीसीएल,कंपन्यांचे पेट्रोल, डिझेल व एलपीजी सिलिंडर वाहतूक करणारे अधिकृत टँकर, तसेच संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाचे परीक्षा साहित्य वाहून नेणारा विशेष ट्रक (एमएच २७-डीटी ०५८२) यांना प्रवेशाची परवानगी देण्यात आली आहे.नागरिकांची अन्नसुरक्षा, इंधनपुरवठा आणि विद्यार्थ्यांचे शैक्षणिक हित लक्षात घेऊन ही विशेष सवलत देण्यात आली आहे. सवलतीचा गैरवापर करून व्यावसायिक किंवा बिगर-अत्यावश्यक मालाची वाहतूक केल्यास भारतीय न्याय संहिता आणि मोटार वाहन कायद्यानुसार कठोर कारवाई केली जाईल.

# शहरात एमडी मेफड्रोन पुरवठा करणारा जाळ्यात

## आंतरराज्य टोळीतील मुख्य सूत्रधार राजस्थानातून जेरबंद, राजापेठ पोलिस स्टेशन पथकाची धडक कारवाई

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.६अमरावती,**शहरात मोठया प्रमाणात अवैध्यरित्या मेफेड्रान (एम.डी.) अंमली पदार्थाचा पुरवठा करणारा आंतरराज्य टोळीतील मुख्य सुत्रधाराला राज्यस्थानातून बेड्या ठोकण्यात आल्या आहेत. राजापेठ पोलिस स्टेशनच्या पथकाने ही मोठी धडक कारवाई केली. रामनिवास जगदिशकुमार बिश्नोई (वय २२ वर्ष रा. डुंगरवा तहसिल बागोडा, जिल्हा जालौर राजस्थान) असे अटकेतील आंतरराज्यीय टोळीतील तस्कराचे नाव आहे.तांत्रिक विश्लेषनाच्या आधारे उल्लेखनिय अशी प्रभावी कार्यवाही केली आहे.

पोलीस आयुक्त यांनी शहरातील अंमली पदार्थाची साठवणूक, विकी व वाहतुक करणाऱ्या इसमांवर प्रभावी कार्यवाही करून अंमली पदार्थ विरोधात मोहिम बविण्याबाबत आदेश प्राप्त झाले होते. यांवरून पोलीस निरीक्षक संदीप चव्हाण, पोलीस स्टेशन राजापेठ अमरावती शहर यांचे नेतृत्वात पथकातील पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी १ ऑगस्ट रोजी राजापेठ पोलिसांनी गुप्त माहितीचे आधारे आरोपी साहील राजेश मेहरा (वय २२, रा. शिवाजी संकुल, अकोली रोड) यास ताब्यात घेतले होते. त्याच्याकडून एम.डी पावडर कि.अं. ४१,५५,००० रुपये, एक ईलेक्ट्रानिक वजन काटा ४,००० रु., चारचाकी वाहन



१०,००,००० रुपये, २ मोबाईलफोन १,७०,००० रु. असा एकूण ५३,२९,०५० रू. मुद्देमाल जप्त करून पोलीस स्टेशनराजापेठ, अमरावती शहर येथे गुन्हा नोंद करण्यात आला होता.

गुन्हाची व्याप्ती ही मोठ्या प्रमाणात असल्याने, सदर गुन्हाचा तपास वरिष्ठ अधिकारी यांचे आदेशान्वये करत असतांना, नमुद आरोपी यांनी सदरचा (एम.डी.) मॅफेडॉन अंमली पदार्थ हा त्याने राज्य राजस्थान मधील आरोपी मोबाईल क्रमांक ८३०२४७२५८४ व ८००३८०२९९०) याचे सोबत व्हॉटस अॅप द्वारे वारंवार संपर्क करून, आणल्याचे सांगितले होते.गुन्हाचे तपासात मा. पोलीस आयुक्त यांचे मार्गदर्शनात व त्यांचे आदेशान्वये पाहीजे आरोपीचा शोध घेण्यासाठी पोलिस स्टेशन राजापेठ, अमरावती शहर चे गुन्हे प्रकटिकरण पथक राजस्थान राज्यात जावून तेथे काही दिवसांपासूनरात्र दिवस सतत अथक परिश्रम व वेशांतर करून तेथील स्थानीक पोलीसांचे सहाकार्याने तांत्रिक माहीतीचे आधारे पाहीजे आरोपी रामनिवास जगदिशकुमार बिश्नोई वय २२ वर्षरा. डुंगरवा तहसिल बागोडा, जिल्हा जालौर राजस्थान याचा शोध घेतला आणि ताब्यात घेतले. तसेच आणखी एक आरोपी फरार झाला आहे.ही कारवाई पोलीस आयुक्त राकेश ओला यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस उपायुक्त परि - २, श्याम घुगे, सहायक पोलीस आयुक्त संजय खताळे, यांचे मार्गदर्शनात पोलीस स्टेशन राजापेठचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संदिप चव्हाण यांच्या नेतृत्वात स.पो.नि. नितीन शिंदे, पोलीस अंमलदार मनिष करपे, पंकज खटे, रवि - लिखितकर, शशीकांत शेळके, पवन तिवारी, अर्जुनकदम, रफिक खान, अंकुशकाळे, पंकज माठे, आकाश यादव, प्रशांत बोलोरकर, अमोल देशमुख यांनी केली.

# गुरुकुंज मोझरीसाठी १४७ कोटी, तर श्रीक्षेत्र कौंडण्यपूरसाठी २२४ कोटींचा विकास आराखडा मंजूर

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.६ अमरावती**
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांची पुण्यभूमी गुरुकुंज मोझरी आणि धार्मिक व ऐतिहासिक महत्त्व लाभलेले श्रीक्षेत्र कौंडण्यपूर यांच्या सर्वांगीण विकासासाठी मोठी भेट मिळाली आहे.गुरुकुंज मोझरीसाठी १४७ कोटी आणि कौंडण्यपूरसाठी.२२४ कोटी रुपयांचाविकास आराखडा उच्चाधिकार समितीच्या बैठकीत मंजुरीसाठी सादर करण्यात आला आहे. याशिवाय, वलगाव येथील संत गाडगेबाबा समाधी परिसराच्या विकासासाठी १० कोटी ९९ लाख रुपयांच्या कामांचा प्रस्ताव ठेवण्यात आल्याची माहिती स्थानिक आमदार राजेश वानखडे यांनी दिली.

आमदार राजेश वानखडे यांनी सांगितले की, राष्ट्रसंतांनी निर्माण केलेल्या जुन्या वास्तूंचे मूळ स्वरूप कायम ठेवून त्यांचे नूतनीकरण (रिनोवेशन) केले जाईल. मोझरी येथे दरवर्षी येणाऱ्या लाखो भक्तांसाठीं भक्त निवास, ध्यान केंद्र, सौर ऊर्जा



प्रकल्प आणि पिण्याच्या पाण्याची व्यवस्था केली जाणार आहे.पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखालील जिल्हा समितीने या आराखड्याला मंजुरी दिली असून, जिल्हाधिकाऱ्यांनी एचपीसी बैठकीत याबद्दलमाहिती दिली.

या प्रकल्पांमुळे अमरावती जिल्ह्यातील पर्यटन आणि आध्यात्मिक विकासाला मोठी गती मिळणार आहे.

### गुरुकुंज मोझरी आराखड्याची वैशिष्ट्ये

आध्यात्मिक संकुलासाठी १७ कोटी ३५ लाख, ग्राम विकास प्रबोधिनीसाठी ६ कोटी ७९ लाख आणि पालखी महोत्सव भवनासाठी ९ कोटी ८० लाख रुपयांची तरतूद.

राष्ट्रसंतांच्या काळातील इमारतींच्या रिनोवेशनसाठी १९ कोटी १७ लाख, समाधीचे दगडी शिल्प उभारण्यासाठी ९ कोटी ५८ लाख, तर सीताराम महाराज कुटीसाठी १ कोटी ४४ लाख रुपये,

भक्त निवास (६ कोटी), सौर ऊर्जा व शेती (१० कोटी १७ लाख), वृद्धाश्रम (३ कोटी ३१ लाख), व्ही. आय. पी. विश्रामगृह (३ कोटी १८ लाख), सप्तनदी कुंड व अस्थी विसर्जन स्थल विकास (२ कोटी २९ लाख), तसेच रस्ते, वीज व अंतर्गत सजावटीसाठी २७ कोटी ९३ लाख रुपयांची तरतूद आहे.

# जि.प., पं.स. मधील आरक्षणात बदलाचे संकेत

## २७ ऑक्टोबरपूर्वी काढावे लागणार आरक्षण

### दिवाळीनंतरच होणार निवडणुका

विदर्भ प्रजासत्ताक
**दि.६चांदूर बाजार–** राज्यातील आरक्षणामुळे रखडलेल्या जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुका दिवाळीनंतर जाहीर होण्याची शक्यता लक्षात घेता संभाव्य निवडणुकीचे संकेत मिळाल्यानंतर इच्छूक पुन्हा एकदा सक्रिय झाल्याचे दिसत आहेत. असे असले तरी, ना.मा.प्र. प्रवर्गाचे आरक्षण ५० टक्केचे वर असल्यामुळे ना.मा.प्र.च्या आरक्षणात बदल होणाच्या शक्यतेमुळे राजकिय नेत्यांची गणिते बिघडली आहे.

एस.आय.आर. चा कार्यक्रमाला मुदत वाढ देण्यात आली. दरम्यान हरकती मागविल्यावर त्याची प्रक्रिया पुर्ण झाल्यानंतर मतदारांची अंतिम यादी २७आक्टोंबर रोजी प्रसिध्द होणार आहे. तत्पुर्वी आरक्षण काढणे अनिवार्य आहे. ८ नोव्हेंबरला दिवाळी असल्याने निवडणुकीची घोषणा दिवाळीनंतरच डिसेंबरमध्ये होण्याची शक्यता आहे. आरक्षणाचा कार्यक्रम लवकरच




जाहीर होण्याचे संकेतसुद्धा प्रशासनाकडून देण्यात आले आहेत. मात्र यासाठी जिल्हा प्रशासनाला निवडणुक आयोगाच्या आदेशाची प्रतिक्षा आहे. आरक्षण प्रक्रियेत अनुसूचित जाती आणि जमातीसाठी राखीव असलेल्या जागा कायम ठेवून केवळ नागरिकांचा मागासप्रवर्ग (ओबीसी) व सर्वसाधारण गटातील आरक्षणाच्या सध्याच्या स्थितीत बदल होणार आहे. त्यात ना.मा.प्र.च्या जागा कमी होऊन सर्वसाधारण जागेत वाढ होण्याची शक्यता आहे, त्यामुळे अनेकांनी यापूर्वी लावलेली राजकीय गणिते कोलमडणार आहेत. मागील अनेक वर्षांपासून जिल्हा परिषद आणि बहुतांश पंचायत समित्यांवर प्रशासकराज सुरू आहे. विधानसभा निवडणुकीच्या पूर्वी जिल्हा परिषद तसेच १४ पंचायत समित्यांच्या ११८ गणांच्या आरक्षणाची प्रक्रिया प्रशासनाकडून करण्यात आली होती. त्यानंतर इच्छुक कामाला सुद्धा लागले होते. मात्र ओबीसी आरक्षणाच्या मुद्द्यावर न्यायालयाकडून या प्रक्रियेला स्थगिती देण्यात आल्यानंतर इच्छुकांचा उत्साह थंडावला. आता पुन्हा एकदा न्यायालयाच्या सुचनेनुसार शासनस्तरावर निवडणुका घेण्याच्याहालचाली सुरू करण्यात आल्या आहेत. डिसेंबरमध्ये संभाव्य निवडणुका होणार, असे गृहित धरून इच्छुकांकडून मोर्चेबांधणी सुरू झालीपरंतु पुन्हा एकदा आरक्षणात बदल होण्याचे संकेत असल्याने इच्छुकांमध्ये धास्ती निर्माण झाली आहे. आता आरक्षणानंतरच पाहू, अशी भुमीका आता राजकिय वर्तुळात घेतल्या जात आहे.

# दुचाकीचालकावर बिबट्याची झडप

## राजुरा नाका परिसरात बिबट्याचा धुमाकूळ





**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.६ अमरावती**
शहरालगतच्या राजुरा नाका परिसरात बिबट्याच्या वावराने पुन्हा एकदा खळबळ उडाली आहे. ५ ऑगस्ट रोजी रात्री सुमारे ८ वाजताच्या सुमारास राजुरा येथील निखिल संतोष गिरी (वय ३२) हे आपल्या आईला दुचाकीवर घेऊन शहराकडे येत असताना बिबट्याने अचानक झडप घातली. या हल्ल्यात त्यांच्या पायाला किरकोळ दुखापत झाली असून, परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. घटनेनंतर काही काळ परिसरात एकच गोंधळ उडाला. माहिती मिळताच राजुरा नाका परिसरात शेकडो नागरिकांनी गर्दी केली. परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन फ्रेजरपुरा पोलीस तातडीने घटनास्थळी दाखल झाले आणि परिसरात बंदोबस्त ठेवण्यात आला.याच परिसरात यापूर्वीही घनश्याम गहेकर तसेच निलेश किसन पवार यांच्यावर बिबट्याने हल्ल्याचा प्रयत्न केला होता. सलग घडणाऱ्या या घटनांमुळे राजुरा परिसरात बिबट्याचा मुक्त संचार सुरू असल्याची भीती नागरिकांनी व्यक्त केली असून वनविभागा च्या प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे. दरम्यान, वनविभागाचे अधिकारी काही वेळाने घटना स्थळी पोहोचले. घटनास्थळाचा पंचनामा केला. तर बिबट्याचा तातडीने बंदोबस्त करावा, तसेच नागरिकांच्या जीविताची सुरक्षा सुनिश्चित करण्यासाठी त्वरित पिंजरा लावणे, गस्त वाढविणे आणि बिबट्याला जेरबंद करण्याची मोहीम राबवावी, अशी जोरदार मागणी नागरिकांनी केली. घटनास्थळी एक नव्हे तर तब्बल तीन बिबटे दिसल्याचा दावा नागरिकांनी केला. त्यामुळे परिसरात भीतीचे वातावरण अधिक तीव्र झाले असून वनविभागाने तातडीने पाहणी करून योग्य ती कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांनी केली आहे.

# शेकदरी लघुप्रकल्प पर्यटकांच्या आकर्षणाचे केंद्र

## निसर्गसौंदर्याने पर्यटकांना भुरळ, एक हेक्टर ६० आर जागेवर सुसज्ज पर्यटन केंद्र

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.६वरुड–** सातपुडा पर्वतरांगांच्या कुशीत वसलेले शेकदरी लघुप्रकल्प पर्यटन केंद्र हिरवाई, जलाशय आणि विविध पर्यटन सुविधांमुळे पर्यटकांचे आकर्षण ठरत आहे. मात्र येथे पुरेशा सुरक्षेचा अभाव असल्याने आवश्यक उपाययोजना करण्याची मागणी निसर्गप्रेमींकडून होत आहे. जिल्हा नियोजन समितीच्या निधीतून शेकदरी सिंचन विभागाने सुमारे एक हेक्टर ६० आर जागेवर सुसज्ज पर्यटन केंद्र उभारले आहे. हिरवेगार लॉन, रंगीबेरंगी फुलांची बाग, लहान मुलांसाठी खेळण्यांची सुविधा, प्रशस्त सभागृह आणि फलंदाजीचा सराव करण्यासाठी ची व्यवस्था असल्यामुळे पर्यटक येथे मोठ्या संख्येने भेट देत आहेत. महाराष्ट्र-मध्य प्रदेश सीमेवरील सातपुडा पर्वतरांगांच्या पायथ्याशी वसलेल्या या परिसरात घनदाट वनसंपदा असून सुखी नदीचे उगमस्थानही जवळ आहे. प्रकल्पाच्या अतिरिक्त पाण्याचा शुभ्र धबधबा आणि परिसरातील निसर्गसौंदर्य पर्यटकांना विशेष आकर्षित करत आहे. या जंगल परिसरात मोर, कोल्हे, रानडुक्कर, रोही, विविध पक्षी तसेच वाघ, अस्वल आणि बिबट यांसारख्या वन्यप्राण्यांचा अधिवास आहे.



परिसरातील प्राचीन श्री कपीलेश्वर शिवलिंग गुहा आणि सात कुंडांमुळे भाविक व पर्यटकांचीही मोठी गर्दी होत असते. पर्यटन केंद्र सकाळी नऊ ते सायंकाळी पाच वाजेपर्यंत खुले असले तरी येथे सुरक्षारक्षकांची कमतरता असल्याची तक्रार आहे. काही अल्पवयीन मुलांकडून तसेच मद्यप्राशन करणाऱ्यांकडून परिसरात गैरप्रकार होत असल्याचे सांगितले जात असून पर्यटनस्थळाची सुरक्षितता वाढविण्यासाठी प्रशासनाने तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी मागणी निसर्गप्रेमींनी केली आहे.

# नुकसानग्रस्तां शेतकऱ्यांची मदतीची आशा मावळली

## निकषात अस्पष्टता : जिल्हा कृषी अधिकाऱ्यांनी मागविले मार्गदर्शन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.६अमरावती –** सोयाबीनच्या बोगस बियाणे प्रकरणांत नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना सहायता निधी देण्यासंदर्भातील आदेशात संभ्रम असल्याने मदत करायची कशी, हा प्रश्न उपस्थित झाला आहे. जिल्हा नियोजन समितीमधून जिल्हा वार्षिक योजनेच्या नावीण्यपूर्ण योजनेतून बाधित शेतकऱ्यांना पूर्नपेरणीसाठी साहाय्य्य करण्याचे आदेश काढण्यात आले आहेत. तथापि, स्पष्टता नसल्याने सविस्तर मार्गदर्शन करण्याची विनंती कृषी विभागाने केली आहे. त्यामुळे या खरिपात सहायता मिळण्याची शक्यता मावळली आहे.

यंदाच्या खरीप हंगामात काही खासगी कंपन्यांची सोयाबीनचे बियाणे बोगस निघाले असून त्याची पेरणीनंतर उगवण झाली नसल्याच्या तक्रारी हजारोंच्या संख्येने दाखल झाल्या आहेत. कृषी विभागाने याप्रकरणात संबंधित कंपन्यांविरुद्ध फौजदारी गुन्हेही दाखल केले आहेत. मात्र नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना मदतीसाठी राज्य सरकारने पुढाकार घेतला पाहिजे, अशी मागणी आल्यानंतर मंत्रीमंडळाच्या १४ जुलैला झालेल्या बैठकीत जिल्हा वार्षिक योजनेच्या नावीण्यपूर्ण योजनेतून बाधित शेतकऱ्यांना पूर्नपेरणीसाठी साहाय्य करण्याचा निर्णय झाला. जिल्हा वार्षिक योजनेमधून निधी उपलब्ध करून देण्यास एक वेळची विशेष बाब म्हणून साहाय्य करण्याबाबतचा



प्रस्ताव नियोजन विभागास सादर करण्यात आला. जिल्हाधिकाऱ्यांना त्यासंदर्भातील आदेश २७ जुलैला देण्यात आले आहेत. दरम्यान, २९ जुलैला जिल्हा अधीक्षक कृषी अधिकाऱ्यांनी पाठविलेल्या पत्रात नियोजन विभागाकडून देण्यात आलेल्या मदत देण्यासंदर्भातील कार्यपद्धतीत (एसओपी) स्पष्टता नसल्याचे म्हटले आहे. आदेशात स्पष्टता नसल्याने मदतीची कार्यपद्धती निश्चित करताना अडचणी जात असल्याने मदतीचे निकष स्पष्ट करण्यासंदर्भात मार्गदर्शन मागितले आहे. कृषी आयुक्तांना हे पत्र पाठविण्यात आले असून त्यांच्याकडून स्पष्टता आल्यानंतरच मदतीसाठी पुढील कार्यवाही करण्यात येणार आहे. त्यामुळे या खरीप हंगामात नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना मदत मिळण्याची शक्यता कमी असून किमान रब्बी हंगामासाठी तरी सहायता मिळेल का, असा प्रश्न उपस्थित झाला आहे.

### बोगस बियाण्यांचा मुद्दा काय आहेत अडचणी?

अमरावती जिल्ह्यात दोन हजारांवर तक्रारी असून कोणत्या दिनांकापर्यंतच्या तक्रारी ग्राह्य धराव्यात हे स्पष्ट नाही. काही कंपन्यांनी शेतकऱ्यांना नुकसानभरपाई स्वपातळीवर दिली असल्याने त्यांना या मदतीतून वगळावे किंवा नाही. पूर्नपेरणीचा कालावधी मर्यादित असल्याने अनेक शेतकऱ्यांनी स्वतःच्या आर्थिक साधनातून नवीन बियाणे खरेदी करून पेरणी केली आहे. अशा शेतकऱ्यांना साहाय्यासाठी पात्र ठरवावे का, दुबार पेरणी करण्यास असमर्थ ठरल्याने नापेर राहिलेल्या शेतीक्षेत्रातील शेतकऱ्यांना संपूर्ण हंगाम बाधित झाल्याच्या तक्रारी असून, अशा शेतकऱ्यांना अर्थसाहाय्य्यासाठी निर्देश स्पष्ट नाहीत. निकषाबाबत संभ्रम नुकसानग्रस्तांना बियाणे स्वरूपात साहाय्य्य द्यायचे की आर्थिक साहाय्य्य अनुदान स्वरूपात द्यावे, हे स्पष्ट नाही. स्वखर्चाने बियाणे खरेदी करणाऱ्या शेतकऱ्यांना साहाय्य्यासाठी पात्र ठरवताना कोणते पुरावे ग्राह्य धरावे, याची स्पष्टता नाही. यासोबतच पात्र लाभार्थ्यांचे निकष स्पष्ट नाहीत.

# रस्त्यावर भटक्या कुत्र्यांना खाऊ घालण्यासाठी परवानगी लागणार!

## राज्य शासनाच्या मार्गदर्शक सूचना जारी: आता निश्चित 'फिडिंग झोन' मध्येच अन्न द्यावे लागणार

अरुण जोशी

**दि.६अमरावती** राज्यभरात भटक्या श्वानांचा वाढता उपद्रव आणि नागरिकांवरील हल्ल्यांच्या घटनांची गंभीर दखल घेत सुप्रीम कोर्टाच्या आदेशानंतर राज्य शासनाने सर्व महापालिका, नगरपालिका व नगरपंचायतीं साठी १४ कलमी कठोर मार्गदर्शक सूचना जारी केल्या आहेत. या नव्या नियमांनुसार आता रस्त्यांवर किंवा सार्वजनिक ठिकाणी भटक्या श्वानांना मनमर्जीने खाऊ घालता येणार नाही. त्यासाठी नगरपालिकेची रीतसर परवानगी घेऊन निश्चित केलेल्या 'फीडिंग झोन'मध्येच अन्न द्यावे लागणार आहे. शाळा, रुग्णालये, बसस्थानके, रेल्वे स्थानके, क्रीडा संकुले आणि धार्मिक स्थळांसारख्या संवेदनशील ठिकाणी आढळणाऱ्या भटक्या श्वानांना पकडल्यानंतर त्यांना पुन्हा त्याच परिसरात सोडण्यास नव्या मार्गदर्शक सूचनांनुसार पूर्णपणे बंदी घालण्यात आली आहे. शासनाच्या या निर्णयामुळे शहरातील भटक्या श्वानांच्या समस्येवर कायमस्वरूपी तोडगा निघेल, अशी आशा व्यक्त होत आहे. या निर्णयाची प्रशासन किती काटेकोरपणे अंमलबजावणी करते. याकडे लक्ष लागले आहे.



प्रजासत्ताक विशेष

### कुत्र्यांचे निर्बीजीकरण, लसीकरण बंधनकारक

नव्या नियमांनुसार नगरपालिकेला शहरातील सर्व भटक्या श्वानांचे टप्प्याटप्प्याने निर्बीजीकरण आणि रेबीजविरोधी लसीकरण करणे सक्तीचे करण्यात आले आहे. तसेच या श्वानांना ठेवण्यासाठी तात्पुरती किंवा कायमस्वरूपी आश्रय व्यवस्था उभारण्याचे स्पष्ट निर्देश प्रशासनाला देण्यात आले आहेत.

### शहरात भटक्या श्वानांचा उच्छाद संपेना!

शहरातील गल्लीबोळांमध्ये आणि मुख्य रस्त्यांवर भटक्या श्वानांची संख्या दिवसेंदिवस वाढत चालली आहे. रात्रीच्या वेळी दुचाकीस्वारांच्या मागे लागणे, लहान मुले व वृद्धांवर अचानक हल्ले करणे यामुळे नागरिकांमध्ये दहशतीचे वातावरण आहे. शहरात श्वानांचा उच्छाद वाढला असून, या समस्येवर तत्काळ ठोस कारवाई करण्याची मागणी आहे.

### तक्रारींसाठी हेल्पलाइन सुरू करावी लागणार

भटक्या श्वानांचा त्रास, पिसाळलेले श्वान किंवा स्वानदंशाच्या घटनांची माहिती तत्काळ प्रशासनापर्यंत पोहोचावी, यासाठी महापालिका,नगरपालिकेला २४ तास कार्यरत असणारी विशेष 'हेल्पलाइन' सुरू करावी लागणार आहे.

### श्वानांना खाऊ घालण्यासाठी परवानगी, फीडिंग झोन

– रस्त्यावर कुठेही कुत्र्यांना खाऊ घालण्यामुळे नागरिकांना होणारा त्रास लक्षात घेता, आता प्राणीप्रेमींना नगरपालिकेकडून विशेष परवानगी घ्यावी लागेल. पालिका प्रशासन शहरातील मानवी वस्तीपासून काही अंतरावर विशिष्ट 'फीडिंग झोन' निश्चित करेल.

## अमरावतीच्या राजकारणात खळबळ

# नवनीत राणा यांच्या 'त्या' विधानाची जोरदार चर्चा, टोमणा नेमका कुणाला?

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.६अमरावती :**

माजी खासदार नवनीत राणा यांच्या एका वक्तव्याने अमरावतीच्या राजकीय वर्तुळात नव्या चर्चांना उधाण आले आहे. सोशल मीडियावर वेगाने व्हायरल होत असलेल्या एका व्हिडिओमध्ये त्यांनी, मेरे लहजे पे सवाल मत उठाओ... मैं भरी सभा में सांप को साप कहने की हिम्मत रखती हूं, असे वक्तव्य केले आहे. या विधानातील साप हा उल्लेख नेमका कुणाकडे निर्देश करणारा आहे, याबाबत विविध स्तरावर तर्क-वितर्क सुरू झाले आहेत.नवनीत राणा यांनी या वक्तव्यात कोणत्याही व्यक्तीचे किंवा पक्षाचे नाव घेतलेले नसले, तरी त्यांच्या आक्रमक शैलीमुळे या विधानाचे अनेक राजकीय अर्थ लावले जात आहेत. सोशल मीडियावर समर्थक आणि विरोधकांकडून या वक्तव्यावर जोरदार प्रतिक्रिया उमटत असून, विविध चर्चांना उधाण आले आहे.राणा दाम्पत्य त्यांच्या स्पष्टवक्तेपणा आणि आक्रमक भूमिकेसाठी नेहमीच चर्चेत असते. निवडणुका असोत किंवा विविध सामाजिक-राजकीय मुद्दे, नवनीत राणा



यांच्या भाषणशैलीमुळे अनेकदा राजकीय वातावरण तापले आहे. त्यामुळे त्यांच्या या ताज्या वक्तव्यालाही विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे.दरम्यान, या विधानाला विरोधकांकडून काय प्रत्युत्तर दिले जाते आणि यावरून पुढील राजकीय घडामोडींना कोणते वळण मिळते, याकडे अमरावतीसह राज्यातील राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे. सध्या मात्र या व्हिडिओची सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात चर्चा सुरू असून, या वक्तव्यामुळे अमरावतीच्या राजकारणात पुन्हा एकदा खळबळ उडाली आहे. कोणाचेही नाव न घेता केलेल्या या वक्तव्याचा नेमका संदर्भ काय आहे, हे अद्याप स्पष्ट झालेले नसल्याने चर्चांना आणखी उधाण आले आहे.

# पंचवटीतील हॉटेल रोशनीचा परवाना रद्द

## एफडीएची धडक कारवाई

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.६अमरावती**

अमरावती शहरातील पंचवटी परिसरातील प्रसिद्ध हॉटेल रोशनी अँड स्वीट्सवर अन्न व औषध प्रशासनाने (एफडीए) धडक कारवाई करत आज हॉटेलचा परवाना रद्द केला आहे. एफडीएच्या अधिकारी देशमुख यांच्या पथकाने अचानक छापा टाकून हॉटेलची तपासणी केली असता स्वयंपाकघरासह संपूर्ण हॉटेल परिसर अत्यंत अस्वच्छ असल्याचे आढळून आले. अन्न तयार करण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या भांड्यांची स्वच्छता समाधानकारक नसल्याचेही तपासणीत निदर्शनास




आले.हॉटेलमध्ये स्वच्छतेच्या नियमांचे उल्लंघन होत असल्याने अन्नसुरक्षेच्या दृष्टीने ही बाब गंभीर मानत एफडीएने तातडीने कारवाई केली. शहरातील सर्वाधिक वर्दळीच्या ठिकाणी असलेले हे हॉटेल अल्पोपहार, चहा तसेच मिठाईसाठी प्रसिद्ध असून दररोज एसटी बसने प्रवास करणारे हजारो प्रवासी येथे नाश्ता व चहासाठी थांबत असतात. त्यामुळे या कारवाईची शहरात मोठी चर्चा सुरू आहे.एफडीएने सर्व हॉटेल व खाद्यव्यवसायिकांना अन्नसुरक्षा व स्वच्छतेच्या नियमांचे काटेकोर पालन करण्याचे आवाहन केले असून, नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर यापुढेही कठोर कारवाई करण्यात येणार असल्याचा इशाराही दिला आहे.


## शताब्दी वर्षानिमित्त सरसंघचालक भागवत

# अमेरिका-कॅनडात साधणार संवाद

### संघाकडून आंतरराष्ट्रीय बौद्धिक क्षेत्राशी संपर्कावर भर

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.६नागपूर:** राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या शताब्दी वर्षातील संपर्क अभियानाला जागतिक स्वरूपदेखील प्राप्त झाले आहे. संघाने आता भारतीय वंशीय समाजासह आंतरराष्ट्रीय स्तरावरील शैक्षणिक, सामाजिक आणि सांस्कृतिक संस्थांशी संवाद वाढविण्याचे नियोजन केले आहे. त्याचाच भाग म्हणून सरसंघचालक डॉ. मोहन भागवत ऑगस्ट महिन्याच्या अखेरीस अमेरिका-कॅनडाचा दौरा करणार असून, न्यूयॉर्कमधील मॅनहॅटन येथे होणाऱ्या 'वननेस सेलिब्रेशन' कार्यक्रमात ते बीजभाषण करणार आहेत. संघाने शताब्दी वर्षात देशभरात युवकांपर्यंत पोहोचण्यासाठी विशेष मोहीम हाती घेतली आहे.



परदेशातीलदेखील भारतीय तरुण आणि आंतरराष्ट्रीय बौद्धिक क्षेत्राशी संवाद वाढविण्यावरही संघाचे लक्ष केंद्रित आहे. संघाच्या सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, सरसंघचालकांचा दौरा शताब्दी वर्षाच्या जागतिक संपर्क अभियानाचा महत्त्वाचा भाग आहे. भारतीय वंशीय समाज, संशोधन संस्था, सामाजिक संघटना, तसेच सांस्कृतिक संस्थांच्या निमंत्रणावरून विविध कार्यक्रम आयोजित करण्यात येत आहेत.

२९ ऑगस्ट रोजी मॅनहॅटन येथे सरसंघचालकांचे बीजभाषण होईल. या कार्यक्रमात ते परस्परसंलग्नता, समरसता, विश्वबंधुत्व आणि एकात्मता या मूल्यांवर आपले विचार मांडतील. यावर्षी मुंबईतील एका व्याख्यानमालेत प्रश्नोत्तर सत्रादरम्यान मोहन भागवत यांनी स्वतः अमेरिका दौऱ्याची माहिती दिली होती, तेव्हापासून या दौऱ्याची तयारी सुरू आहे. संघाच्या विचारांनी प्रेरित हिंदू स्वयंसेवक संघाच्या माध्यमातून सरसंघचालकांचे कार्यक्रम आयोजित करण्यात येत आहेत. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार अमेरिकेनंतर सरसंघचालक कॅनडा येथेदेखील जातील. विशेष म्हणजे त्यांचा हा पहिलाच कॅनडा दौरा ठरणार आहे. त्यानंतर ते युनायटेड किंगडमलादेखील जाण्याची शक्यता आहे.

# डोमा आश्रमशाळेत 'भूतबाधे'च्या अफवेने घबराट

## १७ विद्यार्थिनींमध्ये विचित्र लक्षणे, प्रशासनाकडून वैद्यकीय तपासणी

### तज्ज्ञ डॉक्टरांचे पथक घटनास्थळी; 'भूतबाधा नसून अफवांवर विश्वास ठेवू नका' असे प्रशासनाचे आवाहन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.६चिखलदरा**

चिखलदरा तालुक्यातील डोमा येथील शासकीय आदिवासी आश्रमशाळेत १७ विद्यार्थिनींमध्ये अचानक विचित्र लक्षणे आढळल्याने परिसरात एकच खळबळ उडाली आहे. काही विद्यार्थिनी विनाकारण मोठ्याने हसणे, रडणे, असंबद्ध बोलणे अशा प्रकारचे वर्तन करत असल्याने पालकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले. या घटनेनंतर परिसरात 'भूतबाधे' च्या अफवा पसरू लागल्या आहेत.घटनेची माहिती मिळताच एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प अधिकारी सिद्धार्थ शुक्ला यांनी तातडीने डॉक्टरांचे



पथक आश्रमशाळेत पाठवून विद्यार्थिनींची वैद्यकीय तपासणी केली. तपासणीनंतर विद्यार्थिनींची प्रकृती स्थिर असून परिस्थिती नियंत्रणात असल्याची माहिती प्रशासनाने दिली आहे.या प्रकरणाची गंभीर दखल घेत माजी आमदार राजकुमार पटेल यांनी अमरावती येथील अप्पर आदिवासी विकास आयुक्तांची भेट घेऊन सखोल चौकशीची मागणी केली. अप्पर आयुक्तांनीही आश्रमशाळेच्या मुख्याध्यापकांशी दूरध्वनीवर संपर्क साधून घटनेची माहिती घेतली.मुख्याध्यापक चौधरी यांनी सर्व विद्यार्थिनी सुरक्षित असून त्यांच्यावर आवश्यक वैद्यकीय देखरेख ठेवण्यात आल्याचे सांगितले. प्राथमिक माहितीनुसार, एकताई गावातील एका विद्यार्थिनीमध्ये प्रथम ही लक्षणे दिसून आली. त्यानंतर पाचडोगरी, चौबीता आणि बुटीदा येथील विद्यार्थिनींमध्येही अशाच प्रकारची लक्षणे दिसल्याचा दावा करण्यात येत आहे. एका विद्यार्थिनीला त्रास सुरू झाल्यानंतर इतर मुलींमध्येही त्याच स्वरूपाची प्रतिक्रिया दिसल्याने विविध तर्क-वितर्कांना उधाण आले आहे.दरम्यान, प्रकल्प अधिकारी सिद्धार्थ शुक्ला यांनी स्पष्ट केले की, वैज्ञानिक युगात भूत-प्रेत असा कोणताही प्रकार नसतो. तज्ज्ञ डॉक्टरांचे पथक आश्रमशाळेसह संबंधित गावांमध्येही तपासणी करत आहे. परिस्थिती पूर्णपणे नियंत्रणात असून पालकांनी अफवांवर विश्वास ठेवू नये असे आवाहन ही करण्यात आले.

# होमियोपॅथी डॉक्टरांच्या नोंदणी विरोधात आयएमएचे कामबंद आंदोलन

## अमरावतीत हजारो रुग्ण उपचाराविना

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.६अमरावती** राज्य शासनाने होमियोपॅथी डॉक्टरांना महाराष्ट्र मेडिकल कौन्सिल (एमएमसी) मध्ये नोंदणी देण्याच्या निर्णयाविरोधात इंडियन मेडिकल असोसिएशन (आयएमए)च्या वतीने गुरुवारी राज्यभर २४ तासांचे कामबंद आंदोलन करण्यात आले. या आंदोलनाचा अमरावती जिल्ह्यातही मोठा परिणाम दिसून आला. शहरातील तसेच जिल्ह्यातील अनेक खासगी रुग्णालयांमधील बाह्यरुग्ण विभाग (ओपीडी) दिवसभर बंद ठेवण्यात आल्याने हजारो रुग्णांना उपचाराविना परतावे लागले. मात्र, आपत्कालीन सेवा आणि अतिदक्षता विभाग पूर्ववत सुरू ठेवण्यात आल्याने गंभीर रुग्णांवर उपचार करण्यात आले.राज्य शासनाने नुकताच होमियोपॅथी डॉक्टरांना महाराष्ट्र मेडिकल कौन्सिलमध्ये नोंदणी देण्याचा निर्णय घेतला आहे. या निर्णयामुळे वैद्यकीय शिक्षण आणि आधुनिक वैद्यक पद्धतीच्या गुणवत्तेवर




परिणाम होण्याची भीती व्यक्त करत आयएमएने तीव्र विरोध नोंदविला आहे. आधुनिक वैद्यकशास्त्राचा स्वतंत्र दर्जा कायम ठेवावा आणि हा निर्णय तातडीने मागे घ्यावा, अशी मागणी संघटनेने केली आहे.

अमरावतीतील आयएमएच्या पदाधिकाऱ्यांनी सांगितले की, शासनाच्या निर्णयामुळे वैद्यकीय क्षेत्रात गोंधळ निर्माण होण्याची शक्यता असून रुग्णांच्या सुरक्षिततेचाही प्रश्न निर्माण होऊ शकतो.

त्यामुळे राज्यभर एकदिवसीय लाक्षणिक कामबंद आंदोलन करण्यात आले आहे. शासनाने या विषयावर तज्ज्ञ समितीची मते विचारात घेऊन योग्य निर्णय घ्यावा, अशी मागणीही त्यांनी केली.दरम्यान, ओपीडी बंद असल्याने नियमित तपासणीसाठी आलेल्या रुग्णांची मोठी गैरसोय झाली. अनेक रुग्णांना औषधोपचार आणि तपासणी न मिळाल्याने निराश होऊन परतावे लागले. कामबंद आंदोलनामुळे आरोग्य सेवा काही प्रमाणात विस्कळीत झाली असली तरी अत्यावश्यक वैद्यकीय सेवा मात्र सुरळीत सुरू ठेवण्यात आल्या. आता शासन या आंदोलनाची दखल घेऊन पुढील भूमिका काय घेते, याकडे वैद्यकीय क्षेत्रासह सर्वसामान्यांचे लक्ष लागले आहे.-

# १२ वर्षांची कागदपत्रे डोक्यावर घेऊन 'तो' पोहोचला झेडपी सीईओंकडे

## न्यायासाठी धाव : अमोल ठाकरेंच्या अनोख्या 'एन्ट्री'ची रंगली चर्चा

**विदर्भ प्रजकसत्ताक**

**दि.६अमरावती** जिल्हा परिषदेच्या कार्यालयात पस्तिशीतील युवक कागदपत्रे कट्ट्यात भरून व ते कट्टे डोक्यावर घेऊन जिल्हा परिषदेत दाखल झाला आणि थेट मुख्य कार्यपालन अधिकाऱ्यांच्या दालनापुढे आला. न्याय मिळण्याच्या अपेक्षेने कागदपत्रांचे ते ओझे तो तब्बल एका तपापासून वाहत आहे. यादरम्यान त्याच्या या अनोख्या एन्ट्रीचीजिल्हा परिषदेत दिवसभर चर्चा रंगली होती.नांदगाव खंडेश्वर तालुक्यातील पहूर येथील मूळ रहिवासी असलेल्या अमोल ठाकरे नामक युवकाच्या वडिलांचे गावात दोन ठिकाणी भूखंड होते. त्यापैकी एक भूखंड हा वडिलांच्या नावाने, तर दुसरा भूखंड आजीच्या नावाने असल्याचे अमोलचे म्हणणे आहे. मात्र, यापैकी आजीच्या नावाने असलेल्या भूखंडाची नोंद दुसऱ्या व्यक्तीच्या नावाने केल्याची तक्रार त्याने ११ नोव्हेंबर २०१४ रोजी ग्रामपंचायतीसह नांदगाव पंचायत समिती, जिल्हा परिषद आदींकडे लेखी स्वरूपात केली. यावर त्याने न्यायासाठी या सर्व




ठिकाणी वारंवार चकरा घातल्या. जिल्हाधिकारी कार्यालयासह व विभागीय आयुक्त कार्यालयासमोर तीनवेळा उपोषण व ठिय्या आंदोलन केले. राज्याच्या ग्रामविकास मंत्री, केंद्रीय ग्रामविकास मंत्री, एवढेच काय तर मुख्यमंत्री कार्यालयाकडे याबाबत न्यायासाठी लेखी पाठपुरावा केला.

२०१४ पासून तर आता ऑगस्ट २०२६ पर्यंत जवळपास १२ वर्षात कट्टाभर कागदपत्रे जमा झाली; पण न्याय मिळाला नाही, अशी खंत अमोलने व्यक्त केली. वडील आणि आजी यांच्या नावावरील जागा वारसा हक्काने नावावर होणे अपेक्षित असताना ती अन्य व्यक्तीच्या नावावर करण्यात आली. या प्रकरणात न्याय न मिळाल्याने त्याने आपला लढा सुरूच ठेवला. अशातच सन २०१४ पासून महसूल व संबंधित प्रशासनाकडे सातत्याने केलेल्या पाठपुराव्याचे अनेक अर्ज, निवेदने आणि तक्रारी करूनही प्रश्न मार्गी न लागल्याने तो आज थेट १२ वर्षांपासून न्यायासाठी केलेल्या कागदपत्रांचे कट्टे डोक्यावर घेऊन जिल्हा परिषद कार्यालयात दाखल झाला. मुख्य कार्यपालन अधिकाऱ्यांना कागदपत्रे सोपवली तेव्हा त्यांच्याकडून कार्यवाहीचे आश्वासन मिळाले.



सांध्य मराठी दैनिक
विदर्भ प्रजासत्ताक
अमरावती येथून प्रकाशित
धन्यवाद वाचकांनो!
विदर्भ प्रजासत्ताक
सांध्य मराठी दैनिक
25 लाख वाचकांनी
आमच्या साईड ला भेट दिल्याबद्दल
विदर्भ प्रजासत्ताक
सांध्य मराठी दैनिक
मुख्य पृष्ठ
अमरावती
विदर्भ
महाराष्ट्र
देश-विदेश
ब्रेकिंग न्यूज
अमरावतीत विकासकामांचा धडाका
पावसाचा जोर वादला
शेतकऱ्यांसाठी महत्वाची बातमी
राज्यातील राजकीय घडामोडी
क्रीडा क्षेत्रातील ताज्या बातम्या
HTTPS://E PAPER.VIDARBHAPRAJASATTAK.COM
आपल्या परिसरातील बातम्या व राज्यभरातील ताज्या घडामोडी
वाचा आता आमच्या सोबत
विदर्भ प्रजासत्ताक
सांध्य मराठी दैनिक
आमच्या चॅनल ला आजच जॉईन व्हा!
स्थानिक बातम्यांवर विशेष भर
राजकीय, सामाजिक, शैक्षणिक व कृषी बातम्या
फोटो व व्हिडिओ सह अपडेट
तत्काळ व विश्वसनीय बातम्या
मो. 8605948853
Follow Us On :